# धिक्कार

## मन साहिना



नंदिनी देशमुख

# धिक्कार मन साहिना

नंदिनी नीळकंठ देशमुख

ई साहित्य प्रतिष्ठान

# धिक्कार मन साहिना

(dhikkar man sahina)

लेखिका:- नंदिनी देशमुख

nandini.deshmukh@gmail.com

9004094617

मुखपृष्ठ : कनक वाईकर
kanak.waikar@gmail.com

Ph : 8888899126

प्रकाशक: ई-साहित्य प्रतिष्ठान

वेब: www.esahity.com

ईमेल esahity@gmail.com

प्रकाशन : ८ मार्च २०१५

©esahity Pratishthan®2015

❖ या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

ही एकांकिका...

“उमलण्या पूर्वीच खुडल्या गेलेल्या मुक्या आणि निष्पाप कळयांना”

वात्सल्यपुर्वक अर्पण

नंदिनी देशमुख

एकांकिका

# कोण तुजसम सांग...

**लेखिका:- नंदिनी देशमुख**

nandini.deshmukh @gmail.com

या एकांकिकेचे पूर्ण अधिकार लेखिकेच्या स्वाधीन आहेत. या एकांकिकेचा प्रयोग करावयाचा असल्यास लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रवेश पहिला

(पडदा वर जातो तेव्हा सुनंदाबाई बाहेर जाण्याच्या तयारीत आहेत.. आणि रस्त्यावर येवून दाराच्या समोर त्यांच्या सुनेची अनिताची वाट बघत उभ्या आहेत. तेवढ्यात गीतावहिनी येतात.)

गीता:- काय सुनंदावहिनी, दिसला नाहीत बरेच दिवसात..! बाहेर निघालात वाटत..!

सुनंदा:- अरे, गीतावहिनी ? तुम्ही इकडे कुणीकडे?

गीता:- आमच्या वहिनीकडे चालले आहे

सुनंदा:- झाली कां वहिनीची सून बाळंतीण?

गीता:- हो झाली की..!

सुनंदा:- काय झालं?

गीता:- मुलगी..

सुनंदा:- पहिल्या तीन मुली आहेत नं..?

गीता:- हो नं.. बघा ना , आता या खेपेला मुलगा होईल असं वाटल होतं, म्हणतात नं तीन मुलींच्या पाठीवर मुलगा होतो म्हणून..

सुनंदा:- काही केल नाही का टेस्ट वगैरे..?

गीता:- नाही हो.. बघा नं, आमचा दादा नकोच म्हणाला.. वहिनीच्या मनात होतं..

सुनंदा:- मग ते का नको म्हणाले?

गीता:- दादा म्हणाले की आजकाल तसे काही करणे म्हणजे कायद्याने गुन्हा आहे शिवाय त्यामुळे दोघांच्या जीवाला धोका असण्याची शक्यता आहे , बाळाच्या आणि आईच्या.. जे काही होईल ते सुखरूप असावे , हातीपायी धड असावे ..

सुनंदा:- अं... त्यात काय? एवढे सगळे लोक करतातच की.. काही होत नाही.. डॉक्टर चांगला पाहिजे मात्र..

गीता:- पैसाही लागतो नं पण! .. अन एवढा पैसा घालून मुलगी निघाली की पुन्हा ते अबोर्शन न्...

सुनंदा:- पुढे मुलीला आयुष्यभर लागणारा खर्च काय कमी आहे हो...?

गीता:- पण आमचा दादा वेगळ्याच विचाराचा आहे हो.. तो म्हणतो की आधीच समाजात मुलींचे प्रमाण कमी आहे.. हजार मुलांमागे फक्त नऊशे मुली आहेत म्हणे.. काही दिवसांनी ते प्रमाण अजून कमी होईल, अहो मुलांना मुली मिळायच्या नाहीत लग्नाला..

सुनंदा:- मग.. या तीन मुली तरी कशाला होवू दिल्या? .

गीता:- त्याच्या मनात नव्हतंच. पण वहिनी.. ! वहिनी कशा आहेत आमच्या.. एकुलता एक मुलगा.. मग त्याला मुलगा नाही झाला तर कसं..? वंशाला दिवा नको कां?

सुनंदा:- काय बाई एकेक काहीतरी .. बरं पण सुनेची तब्येत बरी आहे नं..? नाहीतर काही काही बायका मुलगी झाली की डोक्यात राख घालून घेतात.. लेकराला जवळ घेत नाहीत, अंगावर पाजवत नाहीत..

गीता:- नाही, तिने तसं काही केलं नाही.. पहिले दिवशी रडली थोडी.. पण मग गप्प बसली.. त्या लहान बाळाचा काय दोष हो...! तिच्या पण तब्येतीची काळजी नको का घ्यायला?

सुनंदा:- अहो, तिकडे, आमच्या गावाकडे तर एका बाईने काय केलं माहित आहे कां, मुलगी झाली म्हणून समजलं  तर त्या पोरीचा एक हात अन एक पाय धरला असा.. अन फेकली की हो पलंगावर..

गीता:- काय.. त्या जन्मलेल्या पोरीला..?

सुनंदा:- होय हो.. बिचारी... तिचा एक हात अन एक पाय अधू झाला तेव्हापासून.. बघा ना.. जन्मदात्या आईनंच ..

गीता:- अग आई गं..! आपल्याच लेकराचं  वाटोळं की हो..

सुनंदा:- हो.. पण एकदा लेकरू जन्मल्यावर असा राग राग करून कसं चालेल?

गीता:- तुम्ही काय कुठे बाहेर निघालात वाटत..?

सुनंदा:- हो दवाखान्यात चालले.. आमच्या अनिताला घेवून..

गीता:- सुनबाईला...? काय विशेष..?

सुनंदा:- हं.. विशेष आहे म्हणूनच तर...! झाले दोन महिने..

गीता:- पहिल्या दोन मुली आहेत वाटत ना... आता तीस-यांदा  कां ..?

सुनंदा:- हो... कार्ट्याच झाल्या दोन्ही.. बघा ना.. मुलगा होईल, मुलगा होईल म्हणून वाट बघावी तर...

गीता:- पण तुमच्या दोन्ही नाती छान आहेत हं. लहानी तर खूपच गोड आहे. आणि हुशार पण आहेत..

सुनंदा:- शेवटी मुलींच ना पण. लग्न होवून नवऱ्याच्या घरीच जाणार!

गीता:- मग.. काय टेस्ट करून घ्यायचय कां काय ..?

सुनंदा:- विचार तर चाललाय .. नाहीतर आता पुन्हा तीस-यांदा मुलगी झाली तर चौथ्यापर्यंत कुठ वाट बघायची हो... चला उशीर होतोय.. अनिता.. ए अनिता.. अग आटपल की नाही तुझ..? चल की लवकर.. ह्या कार्ट्या काही सुधरू द्यायच्या नाहीत . त्याचं आवरून निघायचं म्हणजे वैताग आहे नुसता..

गीता:- चला मी पण निघते..

सुनंदा:- अनिता.., झालं की नाही..

अनिता:- आले ... आले .. चला..

सुनंदा:- किती उशीर गं .

अनिता:- लहानी रडत होती हो...

सुनंदा:- बरं चल आता . मुलींच झालं नं सगळ व्यवस्थित? म्हणजे आपल्याला उशीर लागला तरी काळजी नको..

अनिता:- हो.. हो झालं सगळ .. काही काळजी नाही आता..

सुनंदा:- बर ..बर .. चल लवकर.. रिक्षा मिळाला पाहिजे अन पुन्हा तिथ नंबर लागून उशीरच होतो...

प्रवेश दुसरा

(सुनंदा आणि अनिता दोघी दवाखान्यात वेटिंग रूम मध्ये बसल्या आहेत. तिथे समोरच टी पॉयवर वर्तमानपत्रे आणि मासिके आहेत. दोघीही त्यातले मासिक, पेपर घेवून चाळतात ..थोडा वेळ अनिता उगाचच इकडून तिकडे चक्कर मारते.

अनिता:- (कंटाळून) बराच वेळ लागणार अस दिसतंय. मी विचारलं आत्ता एका सिस्टरला, डॉक्टरीण बाई बाहेर कुठेतरी ऑपरेशन करायला गेल्या आहेत म्हणे.

सुनंदा:- आता काय मग.. वाट बघत बसायचं. बर झालं मुलींचं सगळ झालं ते. गर्दी पण वाढतीय बघ आता ..

(तेवढ्यात एक बाई ..सरिता.. प्रवेश करते.)

सरिता:- थोड सरका की बाजूला.. थोडी जागा द्या न् बसायला ..

(सुनंदा थोडी बाजूला सरकून तिला बसायला जागा देते..)

सरिता:- हं.. अस्स ..

अनिता:- आई , तिथे समोर बाहेरच्या हॉलमध्ये इंदिरा गांधी, सोनिया गांधी, प्रतिभाताई पाटील यांचे फोटो लावले आहेत बघा.. छान आहेत, बघितले कां?

सुनंदा:- हो बघितले. डॉक्टर साहेब आता निवडणुकीला उभे राहणार आहेत म्हणे..

अनिता:- पण या बायकांनी राजकारणात एवढे नाव कमावले म्हणजे त्या खूपच ग्रेट आहेत... नाही कां?

सुनंदा:- पण बाईच्या जातीला एवढ सगळ करणं म्हणजे किती त्रास होत असेल नाही?

अनिता:- आई, तसच काही नसतं.. त्यांच्या घरातल वातावरणच वेगळ असतं. लहानपणापासूनच त्या तशाच वातावरणात वाढलेल्या असतात. हं.. पण आता काहीजणीना संघर्ष करावा लागतो हे खरंय...

सरिता:- काहीजणीना नाही.. जास्त बायकांना संघर्षच करावा लागतो.

अनिता:- हो. तरी पण आजकाल बायका किती पुढे चालल्या आहेत नाही कां? प्रत्येक क्षेत्रात बाई आहेच.. आता त्या कुठे कुठे कशात म्हणून कमी पडत नाहीत. आई, आपण पण आपल्या मुलीना खूप शिकवून मोठ्ठ करू .. माझी खूप इच्छा आहे तशी..

सुनंदा:- ते सगळ करू गं.. पण काही म्हण, शेवटी मुलगी ती मुलगीच. कितीही मोठं करा, शिकवा.. शेवटी लग्न करून नवऱ्याच्या घरीच जाणार ना? बाईच्या जातीला चूल न् मूल कधी चुकलय कां? आणि तू काही म्हण अनिता.. मुलगा झाल्याशिवाय बाईच्या जन्माचं सार्थक नाही. तुला वाटत असेल पण या वेळी तुला मुलगाच व्हायला पाहिजे.

अनिता:- आई, आत्ता रस्त्यात तर तुम्ही गीताकाकूशी बोलताना कसं बोलत होतात..

सुनंदा:- दुसऱ्यांशी बोलायला ते सगळ ठीक असतं गं.. ज्याच्या पायाखाली जळत त्यालाच कळत..

सरिता:- आता कसं बोललात बाई..! कसाही असला तरी चालेल पण मुलगा हवाच. घराण्याला वारस हवाच.

सुनंदा:- होय हो, खरच.. आमच्या घरात सगळयांना मुलगेच झाले .. माझ्या सासुबाई, आतेसासूबाई, नणंद आणि मला सुध्दा.. आमच्या एवढ्या मोठ्या घरात चौदा मुलं आहेत आणि मुली फक्त तीनच.

सरिता:- अहो.. म्हणूनच तर.. म्हणूनच तर मुलांना मुली मिळत नाहीएत लग्नाला.. परवा आमचे एक नातेवाईक त्यांच्या मुलाचं नाव नोंदवायला गेले होते एका वधु वर सूचक मंडळात .. तर तिथे आठशे मुलांची यादी होती आणि मुली ..? मुली किती होत्या माहितीये..?

अनिता:- किती..?

सरिता:- फक्त दोनशे.. बघा आता .. आता या मुलांची वय असतील पंचवीस ते तीसच्या दरम्यान.. तेव्हापासून मुली कमी होताहेत बघा.. म्हणजे जवळ जवळ पंचवीस वर्षांपासून हे अस चाललंय.. फक्त फरक एवढाच की त्या वेळेसची पद्धत वेगळी होती आणि आताची वेगळी आहे.. आता या सगळ्या नवीन नवीन मशीन अन काय काय आलय.. या सोनोग्राफीच्या मशीन मुळे तर लगेच कळतं , मुलगा आहे की मुलगी… आणि मग पुढची सगळी काम पण पटापट होतात.. इन्स्टट चा जमाना आलाय ना आता..

सुनंदा:- तसच काही नाही.. बऱ्याच मुलींचे आईवडील मुलीचं नाव वधू वर सूचक मंडळात नोंदवत नाहीत..

सरिता:- नाव नाही नोंदवल तरी मुली मिळत नाहीत हे खर आहे ना ..?

आता काही दिवसांनी महाभारतातल्या सारख होईल. एका मुलीला पाच नवरे.. पण महाभारतात ते पाचजण भाऊ होते.. इथे तर काय..? इथे वेगळच महाभारत घडणार..

सुनंदा:- काहीतरीच काय बोलताय?

अनिता:- काहीतरीच काही नाही आई .. पुढे खरंच काय काय होईल ते सांगत आहेत त्या.. आत्ताच नाही कां बघा ना परवा मंजू वन्स सांगत होत्या त्यांच्या दिरासाठी मुलगी मिळत नाहीये म्हणून..

सुनंदा:- अग मुलगी मिळत नाही म्हणजे त्याच्या मनासारखी मिळत नाहीये.. नाहीतर त्याची काहीतरी भानगड असेल कुठेतरी..

सरिता:- तुम्ही काही म्हणा मुलींच्या आईवडिलांना भाव मात्र आलाय सध्या...

पण ते काहीही असो, आपल्यासारखे काय विचार करणार.. की मुलगा हवाच.. आपल्या इस्टेटीला वारस हवाच.. मग तो कसाही कां असेना. आपल्या चितेला अग्नी द्यायला मुलगा हवाच.

सुनंदा:- खरच आहे तुमचं..

अनिता:- (हळूच त्यांच्या कानात) .. खरच काय आई..? त्या उपरोधाने बोलत आहेत..

सरिता:- काय ग्..? काय बोलते आहेस आईच्या कानात? आई कां सासू?

अनिता:- अं.. काही नाही, कुठ काय? सासूबाई आहेत त्या माझ्या ..

सरिता:- तुझ्या सोबत आल्या आहेत म्हणजे नक्कीच काहीतरी गोड बातमी असणार.. पहिल्यांदाच कां?

सुनंदा:- नाही हो.. पहिल्या दोन मुली आहेत..

सरिता:- मग आता मुलगा पाहिजे असणार. त्या साठीच आला आहात नं इथे या डॉक्टरीन् बाईंकडे? बाई फार हुशार आहेत हं.. यश आहे त्यांच्या हाताला.. आता पैसे थोडे जास्त घेतात ..पण.. ते काय कुणीही घेणारच ..

सुनंदा:- मुलगा झाला तर बरं होईल.. मुलाशिवाय बाईच्या जातीला मोक्ष नाही.. मरतेवेळी तोंडात पाण्याचा थेंब टाकील ..

सरिता:- हो.. पण जवळ असेल तर ना..? मरतांना जे माणूस जवळ असेल ते टाकील की तोंडात पाण्याचा थेंब . आजकाल किती मुलं राहतात हो आईवडिलांजवळ ..? पुण्या-मुंबईत तर बघा.. अर्धे आईवडील तर एकटेच राहतात.. एक तर त्यांची मुलं शिकून परदेशात गेलेली असतात नाहीतर वेगळं बिऱ्हाड करून राहतात..

अनिता:- हो खरंच आहे ते.. आणि बऱ्याच ठिकाणी मुलीच सांभाळ करतात आईवडिलांचा.

सरिता:- हे तर झालं दूर राहणाऱ्या मुलांबद्दल.. जवळ राहणाऱ्यांचं काय? पण आपली मानसिकता काही बदलत नाही. मुलांनी कितीही लाथा घातल्या तरी मुलगा हवाच. घराण्याला वारस हवा.. मरतेवेळी तोंडात पाण्याचा थेंब टाकायला हवा.. चितेला अग्नी द्यायला हवा.. .. मी तुम्हाला सांगते.. आता इथे जेवढया बायका जमल्या आहेत ना.. मनातून त्यांना सगळयांना असंच वाटत असणार की आपल्याला मुलगाच व्हावा.. अहो पहिलटकरणीला सुध्दा वाटत की पहिल्यांदा एकदा मुलगा झाला की झालं.. टेन्शन नाही. ..टेन्शन..? कशाच टेन्शन..? मुलगी होणे , मुलीला जन्म देणे म्हणजे टेन्शन वाटावं बाईला..?

अनिता:- नाही हो तसं काही नसेल..

सरिता:- नाही कसं..? पेपर वाचतेस ना? आत्तापर्यंत पाच लाख मुलींची गर्भात हत्त्या केल्या गेली आहे. बाहेर लोक खून करतात, आपण म्हणतो खुन्यांना शिक्षा द्या.. फाशी द्या.. आणि इथे आईवडीलच प्रत्यक्ष आपल्या मुलीचा खून करतात

. त्यांना कोण शिक्षा देणार? अग .. मुली, काय नाव काय तुझ..? चांगली शिकलेली दिसतेस ..

अनिता:- अनिता..

सरिता:- अनिता, बाहेर फोटो बघितलेस ना.. इंदिरा गांधी, प्रतिभाताई पाटील.. या राजकारणातल्या स्त्रिया.. इतर क्षेत्रातही किती स्त्रिया पुढे गेल्या आहेत ..! लता मंगेशकर, आशा भोसले, कल्पना चावला, सानिया मिर्झा , पी.टी.उषा , दुर्गा भागवत, माधुरी दीक्षित ..किती म्हणून सांगू..? मला एक सांग, ज्या पाच लाख मुलींची हत्त्या झाली त्या पैकी किती तरी अशाच पुढे गेल्या नसत्या कां? त्या पाच लाखामाधूनच एखादीच्या पोटी एखादा शिवाजी, एखादा सचिन जन्माला आला असता .. आणि विशेष म्हणजे हे असे काही करणारेच लोक स्वत:ला सुक्षित म्हणवतात. त्या पेक्षा गरीब, अडाणी परवडले .. ते आपले मुलांना जन्म देतात.. मुलगा असो की मुलगी..

पण.. पण .. ते काहीही असो.. आपण कशाला हा सगळा विचार करायचा? आपल्याला मात्र मुलगाच पाहिजे.. वंशाला दिवा हवाय.. काय खरं ना? (हे वाक्य सुनंदाकडे बघून म्हणते)

सुनंदा:- बाई...

सरिता:- सरिता नाव आहे माझं.. सरिता कोरडे..

अनिता:- सरिता कोरडे? म्हणजे त्या सुप्रसिद्ध समाज सेविका..? खूप ऐकलंय तुमच्याबद्दल..

सरिता:- हो.. मीच .. ती..

सुनंदा:- तुम्ही इथे कशा काय? तुमचं काही काम आहे कां बाईंकडे?

सरिता:- असंच.. साहेबाना भेटायला आले होते.. ते आता निवडणुकीसाठी उभे राहणार आहेत .. म्हणून भेटायचं होतं.. विचार केला बाई आणि साहेब दोघानाही भेटून जावं.. पण त्यांना यायला वेळ दिसतोय अजून.. जाते मी..

(जाते)

अनिता:- सरिता कोरडे , त्या किती खर बोलत होत्या नाही सगळ..?

सुनंदा:- काय खरं..? अग हे राजकारणी लोक.. अस काही बोलल्याशिवाय कशी प्रसिद्धी मिळणार..? समाज सेविका ना ती बाई? मी बरच ऐकलंय तिच्याबद्दल.. सडाफटिंग आहे.. लग्न केलं नाही, ना नवरा ना मूल बाळ.. अन चालली दुसऱ्यांना शिकवायला.. सरिता कोरडे म्हणे.. कोरडीच राहिली नुसती.. नाव सोनुबाई अन हाती कथलाचा वाळा..

अनिता:- आई .. हळू .. काही बोलू नका अस इथ.. ऐकतील सगळे..

इथे नको तो विषय.. (खिडकीतून बाहेर बघते.)

आल्या ..आल्या वाटत.. डॉक्टरीन् बाई..

सुनंदा:- आल्या कां? बर झालं बाई.. आता लागेलच आपला नंबर लागेल पाच-दहा मिनिटात...

(प्रवेश दुसरा समाप्त)

प्रवेश तिसरा

(सुनंदा आणि अनिता डॉक्टरीण बाईंच्या केबिन मध्ये प्रवेश करतात. एका खुर्चीवर डॉक्टरीणबाई बसल्या आहेत.. )

सुनंदा:- नमस्कार डॉक्टरीणबाई..

डॉक्टर:- नमस्कार.. या.. या..

(अनिता पण नमस्कार करते)

डॉक्टर:- बसा.. काय म्हणतात सुनबाई..?

सुनंदा:- अहो,.. तुमच्याकडे यायचं म्हणजे काहीतरी असल्याशिवाय थोडच येणार कुणी?

डॉक्टर:- (अनिताकडे पाहून) म्हणजे पुन्हा..? (चल आत.. डॉक्टरीणबाई तिला तपासण्यासाठी आत घेवून जातात .. पार्श्वभूमीला एक गाणे ... नारी जीवन झुले की तऱ्ह .. इस पार कभी उस पार कभी.. डॉक्टरीणबाई आणि अनिता बाहेर येतात )

डॉक्टर:- सुनंदाबाई.. अहो जग कुणीकडे चाललंय अन तुम्ही? अन काय ग् तू पण ? तुला कळत नाही का? दोन मुली आहेत ना चांगल्या..

सुनंदा:- पण वंशाला दिवा नको का? डॉक्टरीणबाई , आधीच माझा एकुलता एक मुलगा .. आणि त्याला मुलगा नाही झाला तर ..

डॉक्टर:- मुलगा आणि मुलगी यात काही फरक नाही आता..आणि मुलं तरी काय दिवे लावतात हो..? काय ग् अनिता.. तू बोलत नाहीस काही?

अनिता:- काय बोलू..? माझं कुणी ऐकूनच घ्यायला तयार नाही.. मला वाटत, बस झाल्या दोन मुली .. त्यांनाच चांगल शिकवावं, मोठं करावं.. पण मी काय म्हणते ते कुणी लक्षातच घेत नाही ..

सुनंदा:- तिचं काय लक्षात घ्यायचं..? डॉक्टरीणबाई, आम्हाला मुलगाच पाहिजे या वेळेस. .. तुमचं ते काय टेस्ट का फेस्ट असत ते करा ..

डॉक्टर:- अन मुलगी असली तर?

सुनंदा:- मुलगी कशाला पाहिजे आता..? मुलगी असली तर टाका पाडून ..पुढच्या खेपेला होईल मुलगा.. म्हणतात ना तीन मुलींच्या पाठीवर मुलगा होतो म्हणून.. आणि पैशाची काही काळजी करू नका..

डॉक्टर:- काय गं.. तुझं काय म्हणण आहे..?

अनिता:- मुलगा झाला तर काय मला नको आहे कां...? पण मला भीती वाटते हो..

सुनंदा:- त्यात काय भ्यायच..? सगळेजण करतातच की.. आणि डॉक्टरीणबाई आहेतच की..

डॉक्टर:- हो.. पण एक सांगते काकू .. टेस्ट केल्यानंतर रिपोर्ट येतील ते शंभर टक्के बरोबरच येतील याची आम्ही खात्री नाही देवू शकत..

सुनंदा:- म्हणजे..?

डॉक्टर:- म्हणजे एखाद्या वेळेला रिपोर्ट प्रमाणे मुलगा असेल असं आम्ही सांगू पण कदाचित मुलगी असू शकते आणि मुलगी असेल असा रिपोर्ट आला तरी पण तो मुलगा असू शकतो..

अनिता:- अहो असं कसं...? मुलगी निघाली तर आपण तर तिला ठेवत नाही ना..? आणि तो मुलगा असेल तर..

डॉक्टर:- नाही म्हणजे.. तसं काही होत नाही सहसा.. होतच नाही.. पण काय सांगता.. फक्त तुम्हाला कल्पना असावी म्हणून सांगितलं...तशी कल्पना असलेली बरी..

सुनंदा:- आता नशिबात जस लिहीलं असेल तसंच होईल ... त्याला काय करणार?

डॉक्टर:- अनिता, तुझी आणि तुझ्या नव-याची तयारी आहे ना या गोष्टीला..?

अनिता:- हो... त्यांना तर मुलगाच पाहिजे आहे की..

डॉक्टर:- आणि तुला..?

सुनंदा:- तिला पण मुलगा झाला तर काय नको आहे थोडाच..?

डॉक्टर:- ठीक आहे.. आजकाल सगळेच करतात टेस्ट.. तुमची ईच्छा असेल तर करू आपण ..

सुनंदा:- अहो बाईसाहेब.. डॉक्टर लोक करतात म्हणून तर आमच्यासारखे तयार होतात ..

डॉक्टर:- तसं काही नाही.. काही काही लोक घरगुती उपाय करतात अन मग येतात आमच्याकडे निस्तरायला.. बर ते जावू द्या.. किती दिवस झाले पाळी टळून.. कारण त्यासाठी सोळा आठवडे पूर्ण होवू द्यावे लागतात..

अनिता:- हं.. . आता पुढच्या सोमवारी होतील पूर्ण..

डॉक्टर:- ठीक आहे तर मग.. मी सांगते त्या टेस्ट करून घ्या आणि...

(तेवढ्यात डॉक्टरचा फोन वाजतो)

डॉक्टर:- हलो.... हं.. बोला.. हो मी डॉ. तुळपुळे बोलतेय,

डॉक्टर:- हं... हं.. काय..? केव्हा? बाप रे...!

डॉक्टर:- नाही.. नाही मला काहीच माहित नाही.. आत्ताच कळल तुझ्याकडून .. हे मात्र फारच भयानक झालं गं...

डॉक्टर:- हो हो.. मी बोलते तिला नंतर सविस्तर...

(फोन खाली ठेवते आणि एकदम खालीच बसते)

सुनंदा:- काय झालं.. डॉक्टरीणबाई ? एकदम अशा घाबरल्यासारख्या कां दिसतात? कुणाचा फोन होता?

डॉक्टर:- काही नाही.. काही नाही.. तुम्ही जा आता.. आणि नंतर मी सांगेन त्या दिवशी या .

सुनंदा:- अहो पण...

डॉक्टर:- मी सध्या काही बोलण्याच्या मूडमध्ये नाही..

अनिता:- तुम्हाला घाम किती आलाय..? काही वाईट बातमी होती कां?

डॉक्टर:- प्लीज.. आपल झालं ना सगळ बोलून.. आता पुन्हा मी सांगेन तेव्हा या.. मला फोन करा.. मी सांगेन नंतर काय ते..

सुनंदा:- चल गं.. चल जावू आता.. मग बोलू पुन्हा..

(सुनंदा आणि अनिता बाहेर जातात.. पुन्हा फोन वाजतो)

डॉक्टर:- हलो.. हो बोलतेय.. काय..? मला तर काहीच माहित नाही. ती बाई माझ्या दवाखान्यात आली होती? कशाला..? अहो ती बाई कोण आहे माहित आहे कां? सरिता कोरडे.. खूप मोठी समाज सेविका आहे ती. अन ती माझ्या दवाखान्यात कशाला येईल? .. काय..? बाप रे.. तिने नवीन चळवळ सुरु केली आहे..? दवाखान्यात जावून पाहणी करते..? आता आमच्या लोकांना काय माहित हो..? साहेबाना भेटायला सारखे लोक येत असतात कुणी कुणी.. सावध राहायला पाहिजे तिच्यापासून.. ती कुणाचे वाभाडे केव्हा बाहेर काढील सांगता येत नाही.. अन आपण तर सध्या हॉटलिस्टवर आहोत.. काय सांगताय काय? माउली हॉस्पिटल मध्ये सोनोग्राफी मशीनला लॉक केल..?बाप रे ..हे मात्र अति झालं आता.. लोकांचीच मागणी असते म्हणून आपण हे सगळे करतो ना? .. आणि ते साधना गुप्तेच कळल कां? मला पण आत्ताच कळल.. आत्ताच फोन आला होता मला आणि त्या वेळी माझ्यासमोरच एक पेशंट बसला होता. मी एवढी घाबरून गेले होते ना. ती पेशंट बाई सारखं खोदून खोदून विचारत होती काय झालं, काय झालं म्हणून..? आता तिला काय सांगणार..? बघा ना. या अशा गोष्टी लोकांना सांगायच्या थोड्याच असतात? आपण ह्या सगळ्या गोष्टी कशा निभावून नेतो ते आपल्यालाच माहित..? एवढे मोठे हॉस्पिटल चालवायचे म्हणजे काय सोपी गोष्ट आहे कां? किती खर्च असतो! हे ..हे अस कुणाचं ऐकत बसलो ना तर हातात झोळी घ्यायची पाळी येईल.. .. नाही नाही.. मी नाही टेन्शन घेत

कशाचं . आणि साहेब आहेत ना आमचे.. मग काय.. बर.. चला ठेवू..? बेल वाजवते... नेक्स्ट..

(प्रवेश तिसरा समाप्त)

प्रवेश चौथा

(सुनंदा आणि अनिता दवाखान्यातून बाहेर येतात.. आणि रस्त्यावर रिक्षाची वाट बघत उभ्या आहेत..त्यांचे बोलणे चालू आहे..)

सुनंदा:- रिक्षा लौकर मिळाला पाहिजे बाई आता..

अनिता:- आई.. एक गोष्ट लक्षात आली कां तुमच्या.. डॉक्टरीणबाई किती घाबरल्या ते..!

सुनंदा:- हो गं... काय झालं असेल..? कुणाचा फोन होता काय माहित?.! घरून असेल कां... काही वाईट बातमी असेल कां..?

अनिता:- नाही.. घरून नाही.. काहीतरी वेगळीच बातमी आहे.. आपण आत्ता दवाखान्यातून बाहेर पडत होतो नं तेव्हा दोन सिस्टर बोलत होत्या एकमेकींशी ... मी ऐकलं..

सुनंदा:- काय झालं..? कोणी गेलं की काय....?

अनिता:- नाही त्या म्हणत होत्या की कोणत्या तरी डॉक्टरने अशी टेस्ट केली, मुलगी आहे असा रिपोर्ट दिला म्हणून त्यांनी ते पाडून टाकल तर तो मुलगा होता असं कळल म्हणे...

सुनंदा:- बाप रे...! कसं झालं असेल ग् त्या लोकांना..? आई गं.....!

अनिता:- त्या डॉक्टरवर केस करणार आहेत म्हणे ते लोक..

सुनंदा:- हो कां..? अरे बाप रे..!

अनिता:- आणि आणखी एक.. त्या सरिताताई कोरडे आल्या होत्या नं..?

सुनंदा:- कोण ? ती समाजसेविका?

अनिता:- हो त्याच.. त्यांनी एक चळवळ सुरु केली आहे म्हणे.. हे जे चाललंय ना गर्भाची चाचणी करायची, मुलगा की मुलगी ते टेस्ट करायचे आणि मुलीचा गर्भ असेल तर तो पाडून टाकायचा, त्याच्या विरुध्द ..! म्हणून तर त्या तशा बोलत होत्या. त्या अशा हॉस्पिटल मध्ये जावून बघतात म्हणे.. काय चाललंय ..किती लोक अशी चाचणी करून मुलींचा गर्भ पडून टाकतात.. आणि मग ते त्या डॉक्टरला रंगे हाथ पकडतात म्हणे तिथंच..

सुनंदा:- बाप रे .. काय काय एक एक नवीनच..

अनिता:- हे तर काहीच नाही आई .. कायद्याने बंदी घातली आहे म्हणे.. त्या डॉक्टरला शिक्षा होते.. दोन लाख दंड आणि पाच वर्षांची सक्त मजुरी.. तुम्ही तिकडे गेला होतात ना आत तेव्हा मी ऐकलं त्या सिस्टर लोकांच बोलणं ..

सुनंदा:- अग पण साहेब कोण आहेत माहित आहेत सगळ्यांना..

अनिता:- ती सरिता फार डेंजर बाई आहे हं पण.. आली होती की नाही दवाखान्यात? कशी बोलत होती बघितलंत ना? घाबरत नाही कुणाला

सुनंदा:- हो.. खरंच गं बाई.. खरंच.. मला त्या वेळी काही समजलं नाही पण आता तू म्हणते आहेस न् तर लक्षात येतय ..

अनिता:- मला तर आता भीतीच वाटायला लागलीये हो आई... कसं होईल हो हे अस काही झालं तर..?

सुनंदा:- खरंच गं..! तुझं तेव्हाच ऐकल असतं तर बरं झालं असतं बाई...! दोन मुलींच्या पाठीवर ऑपरेशन करायचं म्हणून हट्ट धरला होतास तू, पण मीच नको म्हणाले... तुमच्या त्या लांबवण्याच्या गोळया का काय असतात त्या पण मीच बंद करायला लावल्या... चुकलंच माझं....

अनिता:- पण आता काय करायचं..?

सुनंदा:- काय करणार...? आता आपल्या हातात आहेच काय..? देवच वाली आता आपल्याला.. चल.. इथ जवळच देवीचं मंदिर आहे. जाता जाता देवीच दर्शन तरी घेवून जावू.. देवीलाच साकडं घालू आता काहीतरी

(दोघीजणी देवीच्या देवळात येतात...देवीसमोर एक मंद समई तेवते आहे.. पार्श्वभूमीला एक गाण वाजत आहे.

दार उघड बया .. दार उघड ..

दार उघड बया आता ... दार उघड ...

(सुनंदा आणि अनिता देवळात प्रवेश करतात ..)

सुनंदा:- हं.. कर नमस्कार देवीला.. मनातून कर.. म्हणाव आता या खेपेला तरी मुलगा होवू दे...

अनिता:- जे आपल्या नशिबात असेल ते होईल .. देवीला कशाला उगीच कोड्यात टाकायचं..

सुनंदा:- आता तू मला शहाणपणा शिकवू नकोस.. ही देवी नवसाला पावणारी आहे, म्हणून मुद्दाम तुला इथे घेवून आले..

(सुनंदा देवीला नमस्कार करते..)

सुनंदा:- आई ..अंबाबाई .. जगदंबे .. एकच मागणं मागते तुझ्याकडे.. आता या वेळी तरी नातू होवू दे.. एकुलता एक मुलगा माझा .. अन ही सून.. मुलगा होईल वाटलं पण दोन्ही मुलीच झाल्या. आता तिस-यांदा गरोदर आहे.. तुझी कृपा ठेव ग आई, मुलाला ओटीत घाल .. मी तुझी खणानारळाने ओटी भरेन..

(अनिताकडे बघून)

नमस्कार कर ग.. चांगला मन लावून कर..

(अनिता भक्तीभावाने देवीला नमस्कार करते)

सुनंदा:- (देवीला नमस्कार करते).. हे देवी, जगदंबे, आंबे, माते, तुला कळकळीची विनंती करते ग .. पाया पडते तुझ्या, या वेळी मला फसवू नको नातू होवू दे..

अनिता:- आई, कशाला तुम्ही पुन्हा पुन्हा तेच तेच मागताय..? होवू द्या ना जे काय व्हायचं असेल ते.. देवीला कशाला..?

सुनंदा:- देवीला नको.. डॉक्टरला नको.. मग कुणाला म्हणायचं ग..? कुणाकडे जायच आपण..?

अनिता:- पण  आपण कुणाकडे जायची काही गरजच काय..? कशाला जायचं कुणाकडे..? खर तर दोनच मुलींवर मी समाधानी होते, पण...

सुनंदा:- पण काय..?... आता देवीच काय ती मदत करू शकेल आपल्याला..

(तेवढ्यात देवीचा आवाज घुमतो. देवी बोलायला लागते)

देवी:- मी..? मी काय मदत करणार? असं एवढ कोणत संकट आलय तुमच्यावर ?

सुनंदा:- कोण..? कोण बोलल ग आत्ता? कुणाचा आवाज हा..?

अनिता:- इथे तर आपल्या दोघीशिवाय दुसर कुणीच नाही..

देवी:- मी.. मी आहे ना.. देवी...

सुनंदा:- देवी..? देवी बोलतीये प्रत्यक्ष? अनिता.. बघ.. बघ.. अग देवी बोलतीये.. देवी.. देवी .. आई.. खरच संकट आलय ग.. तीस-यांदा माझी सून गरोदर आहे .. आता.. आता या खेपेला तरी मुलगा व्हायला हवा ग् ..

देवी:- मुलगा..? कशाला हवा मुलगा?

सुनंदा:- कशाला म्हणजे? वंशाला दिवा हवा , इस्टेटीला वारस हवा .. आईवडिलांना अग्नी द्यायला मुलगा हवा.

देवी:- ही सगळी काम आजकाल मुली पण करु शकतात .. कोण म्हणतं  मुलगी वंशाचा दिवा नाही म्हणून? उलट ती तर दोन कुलांचा उद्धार करते. इस्टेटीमध्ये तिला बरोबरीने हक्क आहे. ती आईवडिलांना अग्नी पण देवू शकते.

सुनंदा:- तरी पण..!

देवी:- तरी पण काय?

सुनंदा:- हिला मुलगाच व्हावा असं मला वाटतय ..

देवी:- तुला काय वाटत ग पोरी? बोलत नाहीस तेव्हापासून.. गप्प गप्प आहेस..

अनिता:- आई, अंबाबाई, जे काय होईल ते मी नाकारणार नाही..

देवी:- तर मग ऐक, या वेळेला पण तुला मुलगीच होईल.

सुनंदा:- हे देवा...

देवी:- आता देवाला का बोलवतेस? आता मुलगी होणार म्हटल की देवीचा पण राग करणार का? कां पूजा करता तुम्ही देवीची? गल्लीगल्लीत तिची मंदिर कशाला हवीत तुम्हाला? ती पण एक स्त्रीच आहे ना?

अनिता:- तू नुसती स्त्री नाहीस देवी, तू स्त्री शक्ती आहेस, तू आदिमाया आहेस, या विश्वाची निर्माती आहेस..

देवी:- आणि याच स्त्रीशक्तीकडे येवून तुम्ही तिचाच अव्हेर करता? माझ्याकडे येता आणि मलाच मुलगा मागता? त्या बदल्यात मला काय देता , तर खण आणि नारळ? काय करू मी एवढे खण आणि नारळ घेवून? मुलगी नको म्हणता.. एका निष्पाप जीवाला जन्माच्या आधीच उखडून टाकण्याचा काय अधिकार आहे तुम्हाला? पाप पुण्याच्या गोष्टी पण तुम्हीच करता ना?

सुनंदा:- चुकले मी देवी. माफ कर मला.. आज डोळे उघडले माझे..

अनिता:- देवी, तू प्रत्यक्ष दर्शन दिलंस.. धन्य झाले मी.. हे मूल म्हणजे तुझा प्रसाद समजेन मी.. मी आता तिला जन्म देणार. तिला वाढवणार ..

सुनंदा:- होय देवी, तिला या जगात प्रवेश आम्ही नाकारणार नाही

देवी:- येवू द्या.. या जगात तिला येवू द्या.. तथास्तु..

(हळू हळू रंगमंचावर अंधार.. होवून पुन्हा प्रकाश येतो. देवीच्या समोरून एक पांढ-या शुभ्र वेशातील, गर्भाच्या आकाराची मुलगी हळू हळू समोर येते.. प्रकाशाचा फोकस त्या मुलीवर .एखादे फुल उमलावे तशी ती पुढे येत येत उमलत जाते. आणि म्हणते..)

मुलगी:- होय.. मला येवू द्या.. मला या जगात येवू द्या.. हे जग मला बघायचय.. हे सुंदर जग... का नाही यायचं मी या जगात?

मुलगी म्हणून? पण मुलगी सुध्दा एक माणूसच असते ना? एक माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मला नाही का ? एका स्त्रीच्या उदरातूनच दुसरा अंकुर जन्माला येतो ना? मग तिनेच येणाराचा प्रवेश नाकारावा? आणि स्त्रीनेच काय पण पुरुषाने तरी का म्हणून नाकारावा? आई, बहिण, पत्नी, मुलगी या सर्व नात्याने ती त्याचे जीवन समृद्ध करते ना? स्त्री शिवाय पुरुषही या जगात अधुराच आहे ना? मग.. माझी वाट बघणारा, माझ्यावर प्रेम करणाराही या जगात कुणीतरी जन्माला आलाच असेल ना? माझा हक्क का नाकारताय? मला येवू द्या.. येऊ द्या मला, या जगात येवू द्या...

(समाप्त)


**चार एकांकिका**

- हा छंद जिवाला...
- आज अचानक...
- कोण तुजसम सांग...
- धिक्कार मन साहिना

**लेखिका:- नंदिनी देशमुख**


nandini.deshmukh @gmail.com

या एकांकिकांचे पूर्ण अधिकार लेखिकेच्या स्वाधीन आहेत. या एकांकिकांचे प्रयोग करावयाचे किंवा त्यांचे रुपांतर करायचे असल्यास लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.









# नंदिनी देशमुख



नंदिनी देशमुख यांना ई साहित्यचे वाचक “हा छंद जिवाला” व “आज अचानक” आदि लोकप्रिय एकांकिकांच्या लेखिका म्हणून ओळखतात. मूळच्या त्या नांदेडच्या. त्यांना लहानपणापासूनच लेखनाची आणि वाचनाची आवड होती. मग १९७७-७८ पासून त्यांनी लेखनास प्रारंभ केला. गेल्या पस्तीस वर्षांत अनेक मासिकांमधून त्यांच्या कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. औरंगाबाद आकाशवाणी केंद्रावरून त्यांचे नभोनाट्य आणि ऐतिहासिक लेखन प्रसारित करण्यात आले. कथाश्री, आवाज, स्नेहप्रभा इ. दिवाळी अंकामधून त्यांच्या कथा प्रसिद्ध झाल्या. सकाळ कथा विशेषांक २००९ मध्ये त्यांच्या ‘प्रमोशन’ या कथेला प्रथम पारितोषक मिळाले. लोकसत्ता, सकाळ मधून त्यांनी विविध प्रकारचे लेखन केले. दैनिक प्रजावाणी नांदेड, दैनिक उद्याचा मराठवाडा, नांदेड या वर्तमानपत्रामधून त्यांनी सदर लेखन केले.

महाराष्ट्र राज्य नाट्य परिषद नांदेड शाखेतर्फे ‘अनुवंश’ आणि ‘मी रचना देसाई’ या त्यांच्या नाटकांचे प्रयोग करण्यात आले. कामगार कल्याण मंडळ स्पर्धेत ‘तुमच्यासारख्या तुम्हीच’ या त्यांनी लिहीलेल्या एकांकिकेला प्रथम पारितोषक मिळाले. २००४ मध्ये ‘औट घटकेची राणी ’ ही कादंबरी आणि २०१० मध्ये निरनिराळया मासिकांमधून प्रसिद्ध झालेल्या कथांचा ‘कुंपणाच्या पलीकडे’ हा कथा संग्रह प्रकाशित झाला.

हे सर्व लेखन करत असतानाच त्या नोकरीदेखिल करत होत्या. भारत संचार निगम लिमिटेड, मुंबई येथून लेखाधिकारी या पदावरून निवृत्त झाल्या.

ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांसाठी त्यांनी “हा छंद जिवाला…” आणि “आज अचानक…” या एकांकिका विनामुल्य दिल्याबद्दल वाचकांच्या वतीने आम्ही त्यांचे आभार मानतो.

हे पुस्तक कसं वाटलं ते नक्की कळवा.

## टीम ई साहित्य

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही व्यावसायिक प्रकाशन संस्था नाही. काही सामाजिक ध्येय डोळ्यांसमोर ठेवून मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांच्यासाठी ही तरुणांची संस्था काम करते आहे. सध्या ई साहित्य प्रतिष्ठानचे सव्वा दोन लाख वाचक आहेत.

ई साहित्य प्रतिष्ठानच्या पुस्तक खजिन्यात सातत्याने नवनवीन भर पडत असते. २०१४ मध्ये सुमारे शंभर ई पुस्तके आम्ही प्रकाशित केली. नवीन खूप सारी पुस्तकं लवकरच येत आहेत. एकाहून एक भारी. ही सर्व पुस्तकं सर्वच्यासर्व सव्वा दोन लाख वाचकांना देण्याचा आटोकाट प्रयत्न केला जातो. पण प्रत्येक वेळी ते जमतेच असे नाही. अनेक वाचकांपर्यंत काही पुस्तके पोहोचत नाहीत. पण VIP सदस्यांना मात्र सर्व पुस्तके नक्की दिली जातात. तुम्हाला सर्वच्या सर्व पुस्तके हवी असतील तर VIP सभासद बना.

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे. आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं.

1. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचं पुस्तक ई मेलवर सर्वात आधी मिळतं. त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमाचं आमंत्रण मिळतं. त्यांच्या भावी योजनांची माहिती मिळते. त्यांच्या कामात स्वतः सहभागी होण्याची संधी मिळते.

2. ज्या दहा किंवा अधिक मित्रांना तुमच्यामुळे फ्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तकं मिळाली की ते इतर लोकांना तुमच्याबद्दल सांगतात. त्यांच्यासाठी तुम्ही म्हणजेच ई साहित्यचे प्रतिनिधी बनता.

3. आणि यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आमचा उद्देश आहे मराठीतल्या सहा कोटी साक्षरांना वाचक बनवणं. आणि हे लक्ष्य साध्य करणं हे केवळ आणि केवळ मराठी लोकांना त्यांच्या भाषेवर असलेल्या प्रेमातूनच शक्य आहे. आपल्या भाषेचं राज्य व्हावं म्हणून १०६ हुतात्मे झाले. आपल्या भाषेनं राजा व्हावं म्हणून आपण एक दहा-वीस ई मेल आयडी देणारच ना! वाचनाची आवड असो वा नसो. फ़क्त मराठी साक्षर अशा दहा लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांना वाचनाची आवड आपोआप लागेल. आपणच लावू. लावूच लावू. करूनच दाखवू.

आहे ना : एक दम : तीन काम.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

www.esahity.com या वेबसाईटला भेट द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान